दैनिक महाराष्ट्र www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

# सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे
नविननिश्चल देवाजी येनोरकर (विदर्भ आवृत्ती कार्यकारी संपादक)
लक्ष्मण फकिरबा कांबळे (आवृत्ती संपादक) , किरण काळे (आवृत्ती कार्यकारी संपादक)




छत्रपती संभाजीनगर ॥ वर्ष ६ वे ॥ अंक ४३ ॥ रविवार ०८ फेब्रुवारी २०२६ ॥ RNI No.MAHMAR/2014/54581 ॥ Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 ॥ पाने ४ किंमत २ रुपये ॥

# स्पर्धा परीक्षेत सातत्य व शिस्त महत्त्वाची IPS व IFS अधिकाऱ्यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

पंकज हिरुळकर प्रतिनिधी

अमरावती : राज्य व केंद्र शासनाच्या विविध स्पर्धा परीक्षांसाठी अभ्यासक्रम निश्चित असून, त्या अनुषंगाने योग्य पुस्तके व माहितीचे स्त्रोत विचारपूर्वक निवडणे आवश्यक आहे. स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळविण्यासाठी सातत्यपूर्ण अभ्यास व शिस्त अत्यंत महत्त्वाची असल्याचे मत अधिकाऱ्यांनी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबिरात व्यक्त केले.ङ्ङजिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हा नियोजन सभागृहात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात भारतीय पोलिस सेवेतील अधिकारी सागर भामरे आणि भारतीय वन सेवेतील अधिकारी प्रांजल चोपडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.ङ्ङयावेळी मार्गदर्शन करताना श्री. भामरे म्हणाले की, अखिल भारतीय सेवेच्या परीक्षा ग्रामीण तसेच शहरी भागातील सर्व स्तरांतील विद्यार्थी उत्तीर्ण होऊ शकतात. मात्र, स्पर्धा परीक्षांची तयारी करताना पर्यायी करिअर मार्गांचाही विचार करणे आवश्यक आहे. या परीक्षांसाठी निश्चित कालावधी उपलब्ध असल्याने परीक्षेपूर्वी संपूर्ण अभ्यासक्रमाची माहिती करून घेणे महत्त्वाचे आहे. यासाठी परीक्षेच्या जाहिरातीतील अभ्यासक्रम व मागील वर्षांच्या प्रश्नपत्रिकांचा अभ्यास उपयुक्त ठरतो. पर्यायी विषय निवडताना अभ्याससामग्रीची उपलब्धता व योग्य मार्गदर्शन यांचा विचार करावा. स्वतःच्या बलस्थाने व कमतरता ओळखून अभ्यासाची दिशा ठरवावी. तसेच चालू घडामोडींसाठी वृत्तपत्रे व मासिकांचे नियमित वाचन आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.ङ्ङमार्गदर्शन करताना श्री. चोपडे म्हणाले की, पर्यायी विषय निवडताना अत्यंत काळजी घ्यावी व गरज भासल्यास विषय बदलण्यासही मागेपुढे पाहू नये. स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळविण्यासाठी दररोज किमान सात ते आठ तास दर्जेदार अभ्यास करणे आवश्यक आहे. यासोबतच मॉक टेस्ट देणे गरजेचे असून, त्यामुळे परीक्षेची पद्धत समजण्यास मदत होते. लेखनाचा नियमित सराव करणे, प्रश्न सोडविण्याची गती वाढविणे आवश्यक आहे. या परीक्षांमध्ये संयम महत्त्वाचा असून, अपयशाच्या काळात योग्य मार्गदर्शक व मदतीस तत्पर मित्रांची साथ उपयोगी ठरते, असे त्यांनी नमूद केले.ङ्ङकार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा ग्रंथालय अधिकारी डॉ. सुरज मडावी यांनी केले. ग्रंथालय सहायक संचालक राजेश पाटील यांनी आभार मानले. शिबिराच्या शेवटी उपस्थित



विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना मार्गदर्शकांनी सविस्तर उत्तरे दिली.

# कॉसमॉस बँक आळंदी शाखेचा ३८ वा वर्धापन दिन भव्य व उत्साहात साजरा सेवा, विश्वास व सहकार्याच्या ३८ वर्षांचा गौरव; मान्यवरांच्या उपस्थितीत सोहळा संपन्न

सुहास सावंत / आळंदी

दि. ६ फेब्रुवारी २०२६ रोजी दि कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह बँक लि., पुणे यांच्या आळंदी शाखेचा ३८ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात आणि भव्य स्वरूपात साजरा करण्यात आला. या सोहळ्यास आळंदी व परिसरातील विविध क्षेत्रांतील मान्यवर, खातेदार, ठेवीदार, सभासद, कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.ङ्ककार्यक्रमास वारकरी शिक्षण संस्थेचे सचिव ह. भ. प. बाजीराव चंदिले नाना, आळंदी नगरपालिकेचे नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव अजित वडगांवकर, कॉसमॉस बँकेचे पुणे विभागाचे जनरल मॅनेजर आशिष पेटकर, चिंचवड विभागाचे सहाय्यक जनरल मॅनेजर विवेक इनामदार, आळंदी शाखेचे शाखाधिकारी सुधाकर शिंदे, वरिष्ठ अधिकारी अनिकेत भोसले, उद्योगपती सतीश चोरडिया, दीपक पाटील, नगरसेवक गोविंद कुऱ्हाडे, उद्योजक आशिष चौधरी, मारुती वाघमारे, संतोष खोल्लम, संकेत वाघमारे, अंजना काळे, विकास पाचुंदे, ज्योती चोरडिया यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती



लाभली.ङ्ङयाप्रसंगी नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांनी, संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊली यांच्या पवित्र आळंदी भूमीत असलेली ही शाखा असल्याने बँकेची प्रगती व भरभराट कायम सुरूच राहील, असा विश्वास व्यक्त करत शुभेच्छा दिल्या. श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव अजित वडगांवकर यांनी, सुमारे चार दशकांपूर्वी आळंदी शाखेच्या स्थापनेवेळी ग्रामस्थांनी दिलेल्या सहकार्याच्या आठवणींना उजाळा देत, आपल्या वैयक्तिक व्यावसायिक वाटचालीत तसेच संस्थेच्या शैक्षणिक व सामाजिक विकासात कॉसमॉस बँकेचा मोलाचा वाटा असल्याचे नमूद केले.ङ्कवारकरी शिक्षण संस्थेचे सचिव ह. भ. प. बाजीराव चंदिले नाना यांनी बँकेच्या सुरुवातीच्या प्रवासात वारकरी शिक्षण संस्थेने दिलेल्या सहकार्याचा उल्लेख करत, ''त्वरित सेवा सस्मित सेवा'' या ब्रीदवाक्याशी प्रामाणिक राहून काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांमुळेच बँकेने आजवर विश्वासार्हता जपली असल्याचे सांगत सर्वांना आशीर्वाद दिले. यावेळी संकेत वाघमारे व ज्योती चोरडिया यांनीही आपल्या मनोगतातून बँकेबद्दल गौरवोद्गार काढले.ङ्कपुणे विभागाचे जनरल मॅनेजर आशिष पेटकर व सहाय्यक जनरल मॅनेजर विवेक इनामदार यांनी आळंदीकरांनी व ग्राहकांनी बँकेवर दाखविलेल्या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत, भविष्यातही ग्राहकाभिमुख व पारदर्शक सेवा देण्याची ग्वाही दिली.ङ्ककार्यक्रमाची सुरुवात संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊली व लक्ष्मी माता यांच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आली. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते आरती करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आळंदी शाखेचे वरिष्ठ अधिकारी अनिकेत भोसले यांनी अत्यंत प्रभावीपणे केले, तर शेवटी शाखाधिकारी सुधाकर शिंदे यांनी उपस्थितांचे आभार मानले.ङ्कसेवा, विश्वास आणि सामाजिक बांधिलकीची परंपरा जपत कॉसमॉस बँक आळंदी शाखा पुढील काळातही आळंदी व परिसराच्या आर्थिक विकासात महत्त्वपूर्ण योगदान देईल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

# खेळाडूंना ५ टक्के आरक्षणाचा लाभ जलदगतीने मिळण्यासाठी 'ब्लॉकचेन तंत्रज्ञान' वापरण्यास मान्यता

मुंबई : गुणवत्ताधारक शासकीय व निमशासकीय सेवेमधील ५ टक्के आरक्षणाचा लाभ खेळाडूंना पारदर्शक, जलद व त्रुटीमुक्त पद्धतीने मिळावा, यासाठी ब्लॉकचेन व कृत्रिम बुद्धिमत्ता ( ) या अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करण्यास शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने मान्यता दिली असल्याची माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी रश्मी आंबेडकर यांनी दिली.

रश्मी आंबेडकर म्हणाल्या की, राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांचे आयोजन करणाऱ्या सर्व अधिकृत एकविध क्रीडा संघटनांनी स्पर्धा संपल्यानंतर

७ दिवसांच्या आत स्पर्धेचा अंतिम निकाल, सहभागी खेळाडूंची यादी तसेच गुणपत्रिका अभिलेख



जतनासाठी संचालनालयाकडे अपलोड करणे बंधनकारक आहे. ही सर्व माहिती संबंधित क्रीडा संघटनेच्या अधिकृत पदाधिकाऱ्यांनी डिजिटल स्वाक्षरीद्वारे प्रमाणित करणे आवश्यक आहे.

निर्धारित कालावधीत माहिती अपलोड न केल्यास संबंधित क्रीडा संघटनांचा डिफॉल्टर यादीत समावेश करण्यात येणार आहे. तसेच खेळाडूंनी आपले 'क्रीडा ई-प्रमाणपत्र' क्रीडा विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर अपलोड करणे आवश्यक आहे. दोन्ही बाजूंनी अपलोड करण्यात आलेल्या माहितीची ऑनलाईन पद्धतीने पडताळणी केली जाणार आहे. या नव्या प्रणालीमुळे खेळाडूंना पडताळणीसाठी प्रत्यक्ष विभागीय कार्यालयात येण्याची किंवा कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता भासणार नाही. त्यामुळे खेळाडूंना ५ टक्के आरक्षणाचा लाभ अधिक जलद व सुलभपणे मिळणार आहे.

यासाठी खेळाडू व संबंधित क्रीडा संघटनांनी क्रीडा विभागास पूर्ण सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी रश्मी आंबेडकर यांनी केले आहे.

# संत गाडगेबाबा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्ताने सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन

पुरंदर तालुका (प्रतिनिधी):-
अनिकेत नितीन काळे

थोर समाजसुधारक, कीर्तनकार आणि लोकसंत गाडगेबाबा यांच्या १५० व्या जयंती निमित्ताने सदाशिव पेठ येथील भरत नाट्य मंदिर येथे सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



या कार्यक्रमाच्या माध्यमातून संत गाडगेबाबांच्या विचारांचा जागर केला जाणार असून, यात भजन, कीर्तन आणि भारुडाचा बहारदार कार्यक्रम सादर केला जाईल. या सोहळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे प्रसिद्ध निवेदिका अनघा मोडक यांचे निरूपण लाभणार असून, गायिका केतकी भावे-जोशी आणि ओमकार प्रभूघाटे यांच्या गायनाने हा सोहळा रंगणार आहे.या सर्वांना यशस्वी वाद्यवृंद साथसंगत करणार आहेत. तसेच, हमीद सय्यद यांचे प्रबोधनात्मक भारूड ,शाहिर बाळासाहेब मालुसकर यांची शाहिरी आणि कीर्तनकार संदीप पाल महाराज यांचे कीर्तन श्रोत्यांसाठी पर्वणी ठरेल. हा संपूर्ण कार्यक्रम सर्व नागरिकांसाठी प्रवेश विनामूल्य असून, जास्तीत जास्त लोकांनी उपस्थित राहून या सांस्कृतिक आणि प्रबोधनात्मक कार्यक्रमाचा आनंद घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्यावतीने करण्यात आले आहे.

सूर्योदय

रविवार ०८ फेब्रुवारी २०२६

संपादकीय

## मुंबईकरांचा रेल्वे प्रवास सुखकर होणार का?

सध्या मध्य आणि पश्चिम रेल्वेवर सुमारे ३,२०० हून अधिक लोकल धावतात. प्रवाशांना गर्दीमुक्त आणि अद्ययावत प्रवास सुविधा देण्यासाठी २३८ वातानुकूलित लोकल चालवण्यात येणार आहेत. या नवीन वातानुकूलित लोकलमध्ये आरामदायी आसन व्यवस्था, आधुनिक रचना, ऑक्सिजन नियंत्रक व्यवस्था या करण्यात येणार आहेत. तसेच मुंबई महानगरातील रेल्वे प्रवाशांसाठी १६ हजार कोटी रुपयांचे प्रकल्प सुरू आहेत. हे प्रकल्प टप्प्याटप्प्याने केले जात आहेत, मेट्रोच्या धर्तीवर नव्या रचनेची लोकल तयार केली जाणार आहे. लोकलमध्ये ऑक्सिजन नियंत्रक प्रणाली सुरू करून, प्रवाशांचा प्रवास सुखकर होईल. गर्दी, उष्णता आणि प्रवासातील त्रास कमी करण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वाचा मानला जात आहे. मुंबई रेल्वे विकास महामंडळ (एमआरव्हीसी) आणि भारतीय रेल्वे यांच्या माध्यमातून हा प्रकल्प राबवण्यात येणार असून, टप्प्याटप्प्याने या लोकल सेवेत येतील. वातानुकूलित लोकलमुळे खासगी वाहनांचा वापर कमी होऊन पर्यावरणपूरक प्रवासाला चालना मिळेल. मुंबई लोकल ही मुंबईकरांची जीवनवाहिनी मानली जाते. २३८ वातानुकूलित लोकल चालवण्यास सुरुवात केल्यास मुंबईकरांसाठी दिलासादायक ठरणार आहे. तसेच प्रवाशांचा दर्जा उंचावणार. नवीन वातानुकूलित लोकल चालवण्यास सुरुवात केल्यास एकूण प्रवाशांच्या ६० टक्के प्रवाशांचा प्रवास सुखर होण्याची अपेक्षा आहे. उपनगरीय लोकलमधून दररोज प्रवास करणाऱ्या लाखो प्रवाशांचा प्रवास सुखकर करण्यासाठी रेल्वे आणि एमआरव्हीसीमार्फत अनेक प्रकल्प राबविण्यात येत आहेत.

मुंबई उपनगरीय रेल्वेवर मुंबई अर्बन ट्रान्सपोर्ट प्रकल्प (एमयूटीपी)अंतर्गत विविध पायाभूत सेवा-सुविधा निर्माण करण्यासाठी रेल्वे मंत्रालयाने १९९९ मध्ये मुंबई रेल्वे विकास महामंडळाची (एमआरव्हीसी) स्थापना केली. नवीन लोकल, रेल्वे मार्ग उभारणे, रेल्वे स्थानकांमध्ये सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी एमआरव्हीसीवर सोपविण्यात आली. यासाठी केंद्र सरकार ५० टक्के आणि राज्य सरकार ५० टक्के निधी उपलब्ध करून देत आहे. या निधीतून पश्चिम आणि मध्य रेल्वेच्या उपनगरीय विभागात विविध कामे पूर्ण करण्यात आली, तर काही कामे प्रगतिपथावर आहेत. एमआरव्हीसीने हाती घेतलेले प्रकल्प राबविण्यात अनेक अडचणी येत असल्याने ते निर्धारित वेळेत पूर्ण करण्यात अडथळे येत आहे. यामुळे प्रवाशांना जीव धोक्यात घालून लोकलमधून प्रवास करावा लागतो. स्थापनेनंतर मुंबईकरांचा रेल्वे प्रवास सुखकर करण्यासाठी एमआरव्हीसीने एमयूटीपी १ योजना तयार केली. या योजनेत नवीन लोकल, नवीन मार्गिका, रेल्वे रुळाशेजारी बॅरिकेट लावणे असे विविध प्रस्ताव तयार केले. एमयूटीपी १ प्रकल्पाला २००३-०४ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात मंजुरी देण्यात आली.

या टप्प्यात कुर्ला-ठाणे पाचवी-सहावी मार्गिका, बोरिवली-विरार तिसरी आणि चौथी मार्गिका, ९ डब्यांच्या १०१ नवीन लोकल, प्रकल्पात बाधित होणाऱ्या १५ हजार ८५७ नागरिकांचे पुनर्वसन, पश्चिम-मध्य रेल्वे मार्गावर १२ डब्यांच्या लोकल सुरू करण्यात आल्या. एमयूटीपीचा पहिला टप्पा मार्च २०१२ मध्ये पूर्ण करण्यात आला. यामुळे रेल्वेची प्रवासी वाहतूक क्षमता ३६ टक्क्यांनी वाढली. हे प्रकल्प मार्गी लागतानाच एमआरव्हीसीच्या एमयूटीपी २ टप्प्याला २००८-९ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात मंजुरी देण्यात आली. या प्रकल्पातील योजनांसाठी ८ हजार ८७ कोटी रुपये खर्च अपेक्षित होता. या टप्प्यातील मुंबई सेंट्रल-बोरिवली सहावी मार्गिका, सीएसएमटी कुर्ला दरम्यानच्या पाचवी-सहावी मार्गिकेचे काम प्रगतिपथावर आहे. तर ठाणे-दिवा पाचवी-सहावी मार्गिका आणि अंधेरी ते गोरेगाव दरम्यान हार्बर मार्ग विस्तार करण्याचे काम पूर्ण झाले. ऐरोली-कळवा उन्नत मार्ग २०२१-२२ मध्ये पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले होते. विरार-डहाणू रोड मार्गिकेचे चौपदरीकरणाचे काम २०२२-२३ मध्ये पूर्ण होणार होते. मात्र ही कामे सध्या प्रगतिपथावर आहेत.एमयूटीपी ३ ए टप्प्यात हार्बर मार्गिकेचा विस्तार गोरेगाव बोरिवलीपर्यंत करण्यात येणार आहे. बोरिवली-विरार दरम्यान पाचवी-सहावी मार्गिका, कल्याण-आसनगाव दरम्यान चौथी मार्गिका, कल्याण-बदलापूर दरम्यान तिसरी आणि चौथी मार्गिका, तर लांब पल्ल्याच्या आणि उपनगरीय लोकलसाठी कल्याण यार्डची कामे प्रगतिपथावर आहेत. तसेच १९१ वातानुकूलित रेक उपनगरीय रेल्वेच्या ताफ्यात येणार आहेत.

# कोयनेतील वीज निर्मिती घटली, १४९.६२९ द. लक्ष युनिट वीज निर्मिती कमी! बोगद्याला लागलेल्या गळतीमुळे

चिपळूण : कोयना प्रकल्पाच्या पोफळीतील बोगद्याला गळती लागली आहे. त्याचा परिणाम प्रकल्पाच्या वीज निर्मितीवर झाला आहे. गेल्यावर्षीच्या तुलनेत यावर्षी पोफळीतील बोगद्याला गळती लागली आहे. त्याचा परिणाम प्रकल्पाच्या वीज निर्मितीवर झाला आहे. गेल्यावर्षीच्या तुलनेत यावर्षी १४९.६२९ दशलक्ष युनिट वीज निर्मिती कमी झाली आहे.ङ्कङ्कोयना जलविद्युत प्रकल्पाच्या पोफळी येथील टप्पा १ आणि २ च्या आपत्कालीन बोगद्याला व सर्ज टँकला गळती लागली आहे. ती दुरूस्त करण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे.ङ्कङ्कत्यामुळे मागील तीन महिन्यापासून दोन टप्पे बंद ठेवण्यात आले आहे. त्यामुळे राज्याच्या एकूण वीज निर्मितीच्या उत्पादनात ६०० मेगावॅट वीज निर्मिती तात्पुरती बंद झाली आहे.ङ्कङ्कोयनेसह महाराष्ट्रात यावर्षी मे महिन्यापासूनच पावसाला सुरवात झाली. गतवर्षीच्या तुलनेत पाऊस कमी असला तरी सध्यस्थितीत धरणात मुबलक पाणी आहे. मात्र त्यानंतरही मागील आठ महिन्यांत तब्बल १४९.६२९ दशलक्ष युनिट वीज कमी निर्माण झाली आहे.

या जलवर्षात पश्चिमेकडे २४.३३ टीएमसी पाण्यावर ११४९.०३३ दशलक्ष युनिट वीजनिर्मिती झाली, तर गतवर्षी २९.२५ टीएमसी पाण्यावर १३४८.४९१ दशलक्ष युनिट निर्मिती झाली होती. त्यामुळे पश्चिमेकडे ४.४३ टीएमसी पाणीवापर कमी झाल्याने मोठी वीज तूट निर्माण झाली.ङ्कङ्कसिंचन व पूरनियंत्रणासाठी २७.४६ टीएमसी पाण्यावर १३३.८७४ दशलक्ष युनिट वीज तयार झाली असून गतवर्षीपेक्षा ४९.८२९ दशलक्ष युनिट वाढ नोंदली आहे. चारही जलविद्युत प्रकल्पांचा एकत्रित विचार करता वीज निर्मिती कमी झाल्याने झालेली तूट भरून काढण्याचे नियोजन भविष्यात करावे लागणार आहे.ङ्कङ्कोयना धरणात मुबलक पाणी आहे. राज्यात सर्वाधिक विजेची मागणी उन्हाळ्यात असते. त्या काळात या पाण्याचा जास्तीत जास्त वापर करून वीज निर्मिती करणे शक्य होणार आहे. तसे न झाल्यास उन्हाळ्यात खासगी कंपन्यांकडून जास्त दराने वीज विकत घेण्याची वेळ महानिर्मिती कंपनीला येणार नाही. पोफळीतील ईव्हीटी येथे जलसंपदा विभागाकडून बोगद्यातील गळती काढण्याचे काम केले जात आहे. ङ्कङ्कजलसंपदा विभाग आणि महानिर्मिती कंपनीचे अधिकारी या ठिकाणी कामाची पाहणी करून काम कधीपर्यंत पुर्ण होईल त्याचा आढावा घेत आहेत.ङ्कङ्कपोफळीतील बोगद्यात लागलेली गळती काढण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. त्यामुळे मागील तीन महिने ६०० मेगावॅट वीज निर्मिती कमी झाली आहे. मात्र दुरूस्तीचे काम पूर्ण झाल्यानंतर राहिलेली तुट भरून काढली जाईल. संजय चोपडे,ङ्क मुख्य अभियंता महानिर्मिती कंपनी पोफळी

# अजितदादांना सुनील तटकरेंनी संपवलं? शिंदे गटाच्या बड्या नेत्याचा गंभीर आरोप, म्हणाले, "ज्याने माझ्या मुलाला

रत्नागिरी : अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादीच्या दोन्ही गटात सुप्त संघर्ष सुरू झाला आहे. निधनाच्या तिसऱ्याच दिवशी राष्ट्रवादीच्या नेत्या सुनेत्रा पवारांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. ङ्कङ्कअजित पवारांच्या निधनाला ७२ तासही उलटत नाहीत, तोपर्यंत सुनेत्रा पवारांनी अशाप्रकारे शपथ घेतल्याने यावर विरोधकांकडून टीका होत आहे.

राष्ट्रवादीच्या वरिष्ठ नेत्यांनी शरद पवारांना शह देण्यासाठी हा शपथविधी घडवून आणला, असा आरोपही विरोधकांकडून करण्यात येत आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर शिवसेना शिंदे गटाचे नेते रामदास कदम यांनी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्यावर खळबळजनक आरोप केले आहेत. अजितदादांना सुनील तटकरेंनी संपवलं असल्याचं वक्तव्य त्यांनी केलं आहे. राजकारणात जो माझ्या मुलाला संपवण्याचा प्रयत्न करू शकतो, तो काहीही करू शकतो, अशा आशयाचं वक्तव्य कदम यांनी केलं आहे.

शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस दोन्ही पक्ष महायुतीचा भाग आहेत. तरीही कदम यांनी अशाप्रकारे तटकरे यांच्यावर टीका केल्याने महायुतीत नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे.ङ्कङ्कशपथविधीवरून गलिच्छ राजकारणाचा आरोपङ्कङ्करामदास कदम यांनी अजितदादा पवारांच्या निधनानंतर घडलेल्या घडामोडींवर भाष्य करताना तटकरेंवर निशाणा साधला. ते म्हणाले की, "अजितदादांच्या जाण्यानंतर शरद पवारांना शह देण्यासाठी सुनील तटकरे यांनी अत्यंत गलिच्छ राजकारण केलं. दादांच्या चितेची राख देखील शांत झाली नव्हती, तोच तटकरेंनी वहिनींना (सुनेत्रा पवार) उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घ्यायला लावली. हिंदू संस्कृतीनुसार किमान दहा दिवस दुःखाचे पाळावे लागतात, त्यानंतर शपथविधी झाला असता तर काय बिघडलं असते?"ङ्कङ्कशरद पवार पक्षाचा ताबा घेतील, या भीतीने तटकरेंनी ही चालाख खेळी केल्याचा दावा कदमांनी केला. ज्या माउलीचे कुंकू आणि मंगळसूत्र गेले, त्यांना सुतकही पाळू न देता मुंबईला आणून शपथविधी करायला लावणाऱ्या तटकरेंना महाराष्ट्र कधीही माफ करणार नाही, अशी टीका त्यांनी केली.

"माझ्या मुलालाही संपवण्याचा प्रयत्न केला"

सुनील तटकरे यांनीच अजितदादांना संपवलं, या विरोधकांच्या आरोपाला दुजोरा देताना कदम म्हणाले की, तटकरे काहीही करू शकतात. "ज्यांनी त्यांना मोठं केले, त्यांनाच संपवण्याचं काम ते करतात. माझ्या मुलाला (योगेश कदम) राजकारणात संपवण्याचा प्रयत्न ज्यांनी केला, त्यांच्याकडून दुसरी काय अपेक्षा करणार?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला.ङ्कङ्कोकणात युती न होण्याचे मुख्य कारणङ्कङ्करामदास कदम यांनी तटकरेंवर विश्वासघात केल्याचा आरोप करताना जुन्या कुरघोड्यांची आठवण करून दिली. "लोकसभा निवडणुकीत सुनील तटकरेंना खासदार करण्यासाठी आम्ही अहोरात्र कष्ट केले. मात्र, विधानसभेच्या वेळी त्यांनीच आम्हाला दगा दिला. योगेश दादांना पाडण्यासाठी त्यांनी पूर्ण शक्ती पणाला लावली. याच विश्वासघातामुळे कोकणात शिवसेनेने राष्ट्रवादीशी युती न करण्याचा निर्णय घेतला आहे," असे त्यांनी स्पष्ट केले. या खळबळजनक आरोपांमुळे महायुतीमधील अंतर्गत कलह आता चव्हाट्यावर आला असून, आगामी काळात याचे मोठे पडसाद उमटण्याची शक्यता आहे.

# १०० हून अधिक जण पोलिसांच्या ताब्यात! नालासोपाऱ्यात नायजेरियन नागरिकांची धरपकड

वसई :नालासोपाऱ्यात मोठ्या प्रमाणात नायजेरियन नागरिकांची संख्या वाढत आहे. मात्र काही नायजेरियन बेकायदेशीरपणे वास्तव्य तसेच गुन्ह्यात नायजेरियन नागरिकांचा समावेश आढळून येत आहे. अमली पदार्थाचे व्यवहार व इतर गैरप्रकारात त्यांचा सहभाग आहे. या प्रकारानंतर पुन्हा नायजेरियन नागरिक हे विनापारपत्र, विनाव्हिसा बेकायदेशीरपणे वास्तव्य करीत आहेत. तर काहींनी इमारतीमध्ये कब्जा मिळवित विनापरवानगी व्यवसाय सुरू केले आहे अशी माहिती समोर आली आहे.ङ्कङ्कयाच पार्श्वभूमीवर बुधवारी सकाळपासून पोलीस व महापालिका यांनी संयुक्त कारवाई सुरू केली आहे.ङ्कङ्कनालासोपारा गुमास्ता परवान्याशिवाय नायजेरियन लोक ४० दुकाने चालवत होते. तसेच इकडच्या इमारतींमध्ये काही जागांवर त्यांनी कब्जा मिळवला होता. नागरिकांना याचा त्रास होत असून अशा बऱ्याच तक्रारी आमच्याकडे प्राप्त झाल्या होत्या. त्या अनुषंगाने आज पोलीस प्रशासन आणि वसई विरार महापालिका मिळून संयुक्त कारवाई करत आहोत. या कारवाई अंतर्गत या लोकांच्या घराची झडती घेणे, पारपत्र व्हिसा तपासणे, अशी प्रक्रिया सुरू आहे. आतापर्यंत १०९ विविध देशातील नागरिकांना ताब्यात घेण्यात आलेले आहे. तसेच त्याच्या कागदपत्रांची पडताळणी केली जाईल. आणि त्यानंतरच पुढील कारवाई केली जाईल अशी माहिती परिमंडळ २ पोलीस उपआयुक्त पौर्णिमा चौगुले श्रींगी यांनी सांगितले आहे.




विनापरवाना व्यवसाय करीत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर पोलीस व महापालिका प्रशासनाने नालासोपाऱ्यात नायजेरियन नागरिकांची धरपकड सुरू केली आहे. बुधवारी सकाळपासूनच ही कारवाई सुरू असून आतापर्यंत शेकडो नायजेरियन नागरिकांना ताब्यात घेऊन त्यांची चौकशी सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.ङ्कङ्कवसई विरार परिसरात मोठ्याप्रमाणात नायजेरियन नागरिकांचे वास्तव्य आहे. गेल्या काही वर्षांपासून नायजेरियन नागरिकांची संख्येत वाढ होऊ लागली आहे. अनेक एकदा शहरात बेकायदेशीर वास्तव्य करणाऱ्या नागरिकांचा प्रश्न उभा राहिला आहे.ङ्कङ्कनालासोपारा पूर्वेतील प्रगतीनगर, अगरवाल यासह इतर ठिकाणच्या भागात अधिक प्रमाणात नायजेरियन नागरिकांची वस्ती आहे. त्यांच्यामार्फत रात्रीच्या सुमारास हे अवैध प्रकार केले जाऊ लागले आहेत. त्यांच्या दादागिरीमुळे आजूबाजूला राहणाऱ्या व त्याठिकाणाहून जाणाऱ्या नागरिकांना याचा मनस्ताप सहन करावा लागत आहे. दिवसेंदिवस नायजेरियन नागरिकांची संख्या वाढत आहे.ङ्कङ्काही

# तळा तालुक्यात ५०.१० टक्के मतदान. सोनसडे मतदान केंद्रावर ८५ वयाच्या आजीने बजावला मतदानाचा हक्क

तळा प्रतिनिधी कृष्णा भोसले

तळा तालुक्यात आज (७) फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्याङ्कजिल्हा परिषद व तळा पंचायत समितीच्या निवडणुकीत तळा तालुक्यात टक्के मतदान झाले आहे.ङ्कसकाळी झालेल्या आकडेवारीनुसार ११.३० पर्यंत झालेल्या मतदानात १८ टक्के तर दुपारी १.३० पर्यंत झालेले मतदान ४०.७टक्के तर ३.३० पर्यंत झालेले मतदानङ्क४७ टक्के मतदान झाले तर ५.३०



पर्यंत झालेले एकुण मतदान ५०.१० झाल्याची माहिती प्राप्त झाली आहे.ङ्क तालुक्यातील एकंदरीत मतदान पहाता अतिशय शांततेतङ्कपार पडला.ङ्कफोटो ओळ - सोनसडे येथील मतदान केंद्रावर मतदान बजावण्यासाठी आलेल्या ८५ वर्षाच्या आजीने आपला मतदानाचा हक्क बजावला आहे.

## जांभळ्या रंगात न्हाऊन निघाला हळदी-कुंकू सोहळा! मुलुंडमध्ये कुणबी समाजाच्या महिलाशक्तीचा जागर

मुंबई : कुणबी समाज विकास संघ (रजि.), मुलुंड आणि कुणबी समाज महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने नुकताच गोशाळा रोड परिसरात एका भव्य हळदी-कुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. पारंपारिक संस्कृती आणि आधुनिक खेळांची मेजवानी असलेल्या या सोहळ्याला महिलांचा उदंड प्रतिसाद लाभला.ङ्ङएकता आणि शिस्त: सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे उपस्थित महिलांनी परिधान केलेल्या एकरंग जांभळ्या साड्या. यामुळे संपूर्ण परिसरात समाजाच्या एकतेचे दर्शन घडले. दीपप्रज्वलनाने सुरुवात झाल्यानंतर महिलांनी पारंपारिक पद्धतीने वाण देऊन सणाचा आनंद लुटला. खेळ पैठणीचा आणि सुहासिनींच्या नशिबाचा यांसारख्या खेळांमुळे महिलांच्या सुप्त गुणांना वाव मिळाला.ङ्ङकुणबी समाज विकास संघाचे अध्यक्ष विनायक घाणेकर, सरचिटणीस रविंद्र मांडवकर, शिवसेना महिला आघाडीच्या




पदाधिकारी आणि भागणे प्रतिष्ठान महिला मंडळ आणि परिसरातील शेकडो महिलांची उपस्थिती होती.ङ्ङ''अशा सामाजिक उपक्रमांमुळे समाजातील महिला संघटित होतात आणि एकमेकींना सहकार्य करण्याची भावना वाढीस लागते.'' असं मत सौ. करुणा गावडे (अध्यक्षा, महिला मंडळ) यांनी अध्यक्षीय भाषणात व्यक्त केलेङ्ङहा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महिला मंडळाच्या कार्याध्यक्षा सौ. सेजल गोवले, सचिव सौ. प्रमिला घाणेकर, खजिनदार सौ. रिटा पोवार तसेच सौ. संगिता पांढरे, मनाली पडेल, संजिवनी तांबट, संस्कृती जड्याळ, सविता नाचरे, श्वेता मांडवकर, सुलक्षणा घाणेकर, आशा रहाटे, आरती गोरिवले, अनिशा म्हादलेकर, सुशिला रहाटे, समिता बाईत, सेजल खळे, तेजस्वी भागणे, रेश्मा येद्रे, सोनाली जाधव, प्रियंका उके, बेबी सकपाळ, वैदही मांडवकर, राजश्री खोपटकर, स्वाती जड्याळ आदींनी मेहनत घेतली.

## गृह मंत्रालयाला सूचना; महायुती सरकारची विशेष खबरदारी ,उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना झेड प्लस सुरक्षा व्यवस्था;

मुंबई: राज्याच्या नवनिर्वाचित उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना 'झेड प्लस' दर्जाची सुरक्षा मिळणार आहे. याविषयीचा निर्णय राज्य सरकारने बुधवारी घेतला. याआधी खासदार असताना पवार यांना 'एक्स' दर्जाची सुरक्षा होती. मात्र, उपमुख्यमंत्रिपदी शपथ घेतल्यानंतर पवार यांच्या सुरक्षेची विशेष खबरदारी राज्य सरकारकडून घेण्यात येत आहे.ङ्ङअजित पवार यांच्या अकाली निधनानंतर सुनेत्रा पवार यांना शनिवार, ३१ जानेवारी रोजी उपमुख्यमंत्रिपदी शपथ देण्यात आली. पवार यांच्याकडे तीन खातीही सोपविण्यात आली असून, मंत्रालयात अजित पवार यांच्या वापरातील दालनेही त्यांच्या कार्यालयासाठी मंगळवारी प्रदान करण्यात आली. पुणे आणि बीड हे राज्याच्या राजकारणातील महत्त्वाच्या जिल्ह्यांचे पालकमंत्रिपदही त्यांच्याकडे सोपविण्यात आले. त्यानंतर सुनेत्रा पवार यांच्या सुरक्षेचा आढावा राज्य सरकारकडून घेण्यात आला असून, त्यांच्या सुरक्षेत वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सुनेत्रा पवार यांना यापुढे 'झेड प्लस' दर्जाची सुरक्षा मिळणार असून, त्याविषयीच्या सूचना गृह विभागाला देण्यात आल्या आहेत. सुनेत्रा पवार या आठवड्याच्या अखेरीस किंवा पुढील आठवड्यात पदाचा कार्यभार स्वीकारणार असल्याचे समजते.आणि + अशा सरकारकडून देण्यात येणाऱ्या सुरक्षेच्या विविध श्रेणी आहेत. सुरक्षा यंत्रणा वेळोवेळी आढावा घेऊन सुरक्षा व्यवस्थेचा दर्जा ठरवतात. देशभरातील अतिमहत्त्वाच्या पदावरील व्यक्ती, तसेच कट्टरवाद्यांच्या निशाण्यावर असलेल्या महत्त्वाच्या व्यक्तींना सरकारकडून सुरक्षा पुरवली जाते. झेड प्लस सुरक्षा ही नंतर भारतातील दुसरी सर्वोच्चस्तरीय सुरक्षा व्यवस्था आहे. ती प्रामुख्याने व्हीव्हीआयपी, केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री किंवा अत्यंत धोका असलेल्या व्यक्तींना दिली जाते. झेड प्लस सुरक्षा व्यवस्थेत एक बूलेटप्रूफ गाडी, २ एस्कॉर्ट गाड्या, अधिकारी आणि ८ जवान मिळून ३० पेक्षा जास्त सुरक्षा कर्मचारी तैनात असतात. या व्यक्ती एखाद्या कार्यक्रमाला जाणार असतील, तर आधीच त्या ठिकाणच्या सुरक्षेची तपासणी केली जाते.

# एसटी बसेस फेऱ्यांचा वक्तशीरपणा वाढवा उत्पन्न वाढीसाठी : परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे निर्देश

मुंबई:बसेस वेळेवर धावल्या तरच उत्पन्नाची चाके वेगाने फिरतील असे परिवहन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी सांगितले. मंत्रालयातील दालनात आयोजित उत्पन्नवाढ आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीला एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर यांच्यासह सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.ङ्ङपरिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले की, एसटी ही सर्वसामान्यांची जीवनवाहिनी आहे. किफायतशीर दर, सुरक्षित प्रवास आणि शासनाच्या विविध सवलतींमुळे प्रवाशांचा ओघ वाढत असताना सेवेत वक्तशीरपणा नसेल तर ही वाढ टिकणार नाही. त्याचबरोबर, प्रवाशांना ताटकळत ठेवणे म्हणजे त्यांना पर्याय शोधायला भाग पाडणे आहे.ङ्ङदैनंदिन प्रवासात बसेस उशिरा सुटणे, रस्त्यात बंद पडणे किंवा अचानक फेऱ्या रद्द होणे, अशा तक्रारी असतात. यासाठी आगार पातळीवरील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी अधिक जबाबदारीने काम करून प्रत्येक फेरी नियोजित वेळी सुटेल याची खात्री करावी.ङ्ङप्रत्येक वेळेवर सुटणारी बस म्हणजे वाढत्या उत्पन्नाकडे जाणारे एक पाऊल आहे. वक्तशीरपणाचा थेट संबंध महसुलाशी आहे. वारंवार होणाऱ्या उशिरामुळे हक्काचा प्रवासी खाजगी पर्यायांकडे वळतो, ही बाब गंभीर असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.ङ्ङएसटीचा वाढता दैनंदिन खर्च लक्षात घेता, उत्पन्नवाढीसोबतच काटकसरीचे धोरण काटेकोरपणे राबवण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. स्थानिक पातळीवर नियोजनबद्ध देखभाल, संसाधनांचा कार्यक्षम वापर आणि व्यवस्थापनातील शिस्त यावर भर देण्याचे निर्देश त्यांनी दिले. वक्तशीरपणा हीच एसटीची ओळख ठरली पाहिजे, यादृष्टिने एसटी प्रशासनाने सज्ज होण्याचे निर्देश मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले. प्रवाशांचा विश्वास जपणारी, वेळेवर धावणारी आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम होणारी एसटी, हाच पुढील वाटचालीचा मंत्र असल्याचेही मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.






# लोकरंग

१ साप्ताहिक संवाद

आता राज्यभरात पुस्तकांच्या गावांचा विस्तार



मराठी भाषेच्या संवर्धनासाठी आणि मराठी साहित्याचा सर्वदूर प्रचार आणि प्रसार या ऊद्देशातून २०१७ मध्ये महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील भिलार येथे पुस्तकांचे गाव हि अभिनव संकल्पना सुरु करण्यात आली. या उपक्रमाला साहित्यप्रेमींचा राज्यभरातून ते राष्ट्रीय स्तरावर साहित्य प्रेमींचा भरभरून प्रतिसाद मिळाला. त्यानंतर महाराष्ट्रातील अनेक गावांनी हि संकल्पना आपल्या गावामध्ये राबविण्यासाठी आग्रह धरला. याच पार्श्वभूमीवर आता पुस्तकाचे गाव या संकल्पनेचा विस्तार होणार आहे. या निमित्ताने प्रसिद्ध कवी आणि साहित्यिक डॉ. महेश केळुस्कर यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

१ पुस्तकाचे गाव या अभिनव संकल्पनेचा आता महाराष्ट्रात विस्तार होणार आहे त्याबद्दल?

मराठी भाषा,साहित्य आणि वाचनसंस्कृतीला चालना देण्यासाठी राज्य सरकारने पुस्काचे गाव आणि कवितांचे गाव या दोन्ही योजनांचा राज्यव्यापी विस्तार करण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यापुढे प्रत्येक गावासाठी स्वतंत्र शाशन निर्णय काढण्याऐवजी एकत्रित शाशन निर्णयाच्या चौकटीत या उपक्रमाची अंमलबजावणी केली जाणार आहे. यामुळे या उपक्रमाची अंमलबजावणी अधिक वेगाने आणि सुलभतेने होणार आहे. राज्य मराठी विकास संस्थेतर्फे हा उपक्रम राबविला जाणार आहे.

२या उपक्रमासाठी गावांची निवड करताना शासनाचे निकष काय असणार आहेत?

पुस्तकाचे गाव आणि कवितांचे गाव हा उपक्रम ज्या गावामध्ये राबविला जाईल त्या गावाची निवड करताना तिथली पर्यटन स्थळे,ऐतिहासिक वारसा लाभलेली गावे,संरक्षित स्मारके असलेली ठिकाणे,तसेच आदर्श गाव,स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धन यासारख्या पुरस्कारप्राप्त गावांना प्राधान्य दिले जाणार आहे. साहित्यिक परंपरा जपणारी गावेही समितीयाच्या शिफारशीनुसार या योजनेत समाविष्ट केली जाणार आहेत. कवितांचे गाव योजनेत दिवंगत मराठी कवी कवयत्री यांच्या जन्मगावाना किंवा त्यांच्या वास्तव्यामुळे ओळख निर्माण झालेल्या गावं प्राधान्य दिले जाणार आहे. यासाठी प्रत्येक गावात १५० चौरस फुटांचे दालन उभारणे आणि गावांनी स्वेच्छेने सहभागी होणे बंधनकारक आहे .

३या उपक्रमाचा नेमकं काय फायदा होणार आहे?

पुस्तकांचे गाव आणि कवितांचे गाव या अभिनव उपक्रमांच्या एकत्रित शासन निर्णयामुळे या योजना केवळ पर्यटन प्रतीकात्मक उपक्रम न राहता मराठी भाषेच्या जातं संवर्धनासाठीचे दीर्घकालीन सांस्कृतिक धोरण ठरणार आहे. राज्यभर उभारली जाणारी हि पुस्तकांचे आणि कवितांचे गवे मराठी साहित्याचे जिवंत दालन बनणार असून नव्या पिढीत वाचनाची गोडी निर्माण करण्यात आणि त्यातून नवे दर्जेदार साहित्य देखील निर्माण होण्यास मदत होणार आहे. एकूणच या उपक्रमामुळे मराठी साहित्याचा सर्वदूर प्रचार आणि प्रसार होणार आहे.

२ चला पर्यटनाला

२०२६, आशियातील अग्रगण्य ट्रॅव्हल शो, मुंबईत


२०२६, आशियातील अग्रगण्य ट्रॅव्हल ट्रेड शो, मुंबईतील जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटरमध्ये अधिकृतपणे सुरू झाला. अशा वेळी या शोचे आयोजन करण्यात आले आहे, जेव्हा भारत जगातील सर्वात धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाच्या आउटबाउंड ट्रॅव्हल मार्केटपैकी एक म्हणून ठामपणे उदयास आला आहे. सलग दोन वर्षे द्वारे भारत आणि आशियातील अग्रगण्य ट्रॅव्हल ट्रेड शो म्हणून ओळखल्या गेलेल्या २०२६ मध्ये ६० हून अधिक देशांमधील २,२०० हून अधिक प्रदर्शक सहभागी झाले आहेत, ज्यात ४५ हून अधिक राष्ट्रीय पर्यटन संस्थांचा सहभाग आहे आणि तीन दिवसांत ५०,००० हून अधिक ट्रॅव्हल ट्रेड अभ्यागत आणि १,००० हून अधिक शीर्ष पर्यटन उद्योगातील व्यावसायिक सहभागी होत आहेत.प्रदर्शक आणि अभ्यागतांच्या संख्येत वाढ झाल्यामुळे, या प्रदेशात आयोजित केलेला आतापर्यंतचा सर्वात आंतरराष्ट्रीय स्तरावर वैविध्यपूर्ण आणि सर्वात मोठा कार्यक्रम बनला आहे.६० हून अधिक देशांमधील २,२०० हून अधिक प्रदर्शक, जे राष्ट्रीय आणि राज्य पर्यटन मंडळे, एअरलाइन्स, हॉटेल्स आणि रिसॉर्ट्स, डेस्टिनेशन मॅनेजमेंट कंपन्या, क्रूझ ऑपरेटर्स, आकर्षणे आणि ट्रॅव्हल टेक्नॉलॉजी प्रदात्यांचे प्रतिनिधित्व करतात.युरोप, आफ्रिका, आशिया, मध्य पूर्व, अमेरिका आणि ओशनियामधून मोठा सहभाग, ज्यात दीर्घकाळचे आउटबाउंड बाजारपेठा आणि भारताला प्राधान्यक्रमाची वाढणारी बाजारपेठ मानणाऱ्या उदयोन्मुख आणि अनुभवात्मक पर्यटन स्थळांचा समावेश आहे.ओटीएम २०२६ च्या उद्घाटनाने जागतिक प्रवास उद्योगाच्या भारतासोबतच्या संबंधात एक निर्णायक क्षण अधोरेखित केला आहे. भारत, आता वाढते खर्च करण्यायोग्य उत्पन्न, वाढती आंतरराष्ट्रीय कनेक्टिव्हिटी आणि लांब पल्ल्याच्या, अनुभवात्मक व उच्च-मूल्याच्या प्रवासाची वाढती आवड यामुळे एक प्रमुख विकास बाजारपेठ बनला आहे.

३ नोंद

एलआयबीएफ एक्सपो २०२६ मध्ये व्यापार मंचांमध्ये भारताचा विस्तार

एलआयबीएफ एक्सपो २०२६-मुंबई कॉलिंग या बहु-क्षेत्रीय आंतरराष्ट्रीय व्यापार तसेच बिझनेस नेटवर्किंग इव्हेंटचे आयोजन मुंबईत करण्यात आले. या तीन दिवसीय प्रदर्शनाने सुमारे ३५,००० हून अधिक अभ्यागतांना आकर्षित केले. ज्यामुळे भारतीय उद्योगांना जागतिक बाजारपेठेशी जोडणाऱ्या क्षेत्र-आधारीत मंचांची वाढती मागणी प्रतिबिंबित होते. यावेळी जवळपास १८ पेक्षा जास्त जागतिक परिषदा, २५ पेक्षा जास्त देशांचा सहभाग, ३० पेक्षा जास्त उद्योगांचे प्रतिनिधित्व त्याचप्रमाणे वित्तीय सेवा, आरोग्य सेवा, कायदेशीर सेवा, लॉजिस्टिक्स, उत्पादन, पायाभूत सुविधा आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानासह विविध क्षेत्रांतील २४६ प्रदर्शक सहभागी झाले होते.

दिग्गज व्यावसायिक नेतृत्व, संस्थात्मक प्रतिनिधी, गुंतवणूकदार, धोरणकर्ते आणि क्षेत्रातील तज्ज्ञांना एकत्र आणण्यात आले होते. आयोजकांनी या मंचाला भारत, आखाती प्रदेश, आफ्रिका, युरोप, ब्रिटन, उत्तर अमेरिका आणि आशिया-पॅसिफिक बाजारपेठेतील उद्योग परिसंस्थांमधील संयोजक म्हणून स्थान दिले. सुमारे १०,००० हून अधिक व्यवसाय आणि व्यावसायिक सहभागी क्षेत्र परिषदा, उद्योग गोलमेज परिषदा आणि व्यापार-केंद्रित सत्रांना उपस्थित राहिले. सहभागींनी सीमापार विस्तार धोरणे (क्रॉस-बॉर्डर स्ट्रॅटेजी), पुरवठा साखळी वैविध्य (सप्लाय चेन डायव्हरसिफिकेशन), नियामक अनुपालन चौकट (रेग्युलेटरी कॉम्पलायन्स फ्रेमवर्क) आणि उदयोन्मुख तसेच विकसित बाजारपेठांमध्ये भांडवलाची उपलब्धता यावर चर्चा केली.



**संकलन संयोजन**
**सुबोध रणशेवरे**
**संपर्क -९८३३१४६३५६**
**इमेल -**
subodh.ranshevre
@rediffmail.com

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक
# सूर्योदय
रविवार ०८ फेब्रुवारी २०२६



या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

# पशुपालकांना मोठा दिलासा वीज बिलाच्या टेन्शनमधून सुटका आता कृषी दराने मिळणार वीज

रायगड जि. उ. उपसंपादक /मंगेश यादव :रायगड जिल्ह्यातील पशुपालकांसाठी राज्य सरकारने एक अत्यंत दिलासादायक निर्णय घेतला आहे. पशुपालन व्यवसायाला आता कृषीचा दर्जा देण्यात आला असून, यामुळे जिल्ह्यातील हजारो पशुपालकांना आता व्यावसायिक दराऐवजी सवलतीच्या कृषी दराने वीज उपलब्ध होणार आहे. या निर्णयामुळे पशुपालकांचा उत्पादन खर्च कमी होऊन ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.ङ्ग पशुसंवर्धनाशी संबंधित व्यवसायांसाठी आतापर्यंत कृषी इतर या वर्गवारीनुसार वीज बिल आकारले जात होते. मात्र, आता नवीन निर्णयानुसार ही आकारणी थेट कृषी वर्गवारीप्रमाणे केली जाईल. तसेच, कुक्कुटपालन आणि इतर पशुसंवर्धन प्रकल्पांसाठी सोलर पंप व इतर सौर ऊर्जा संच उभारण्यासाठी सुद्धा कृषी व्यवसायाप्रमाणेच अनुदान आणि सवलत दिली जाणार आहे. या निर्णयामुळे केवळ वीज बिलातच बचत होणार नाही, तर कृषी व्यवसायाप्रमाणेच पशुपालन व्यवसायाला सुद्धा बँकांकडून मिळणाऱ्या कर्जावरील व्याजदरात सवलत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.ङ्गशासनाने घेतलेल्या या निर्णयामुळे रायगड जिल्ह्यातील पशुपालकांसाठी एक सुवर्णसंधी निर्माण झाली आहे. वीज बिलात मिळणाऱ्या सवलतीमुळे पशुपालकांचा दैनंदिन उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणात कमी होईल. यासोबतच यांत्रिकीकरणावर भर देणे अधिक सोपे होईल. जिल्ह्यातील अधिकाधिक पशुपालकांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी आपली नोंदणी पूर्ण करावी.ङ्गडॉ. सचिन देशपांडे, जिल्हा उपायुक्त, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय, रायगडङ्गकोणाला मिळणार या योजनेचा लाभ ?ङ्गया सवलतीसाठी शासनाने काही निकष निश्चित केले आहेत:ङ्गकुक्कुटपालन: २५ हजार किंवा त्यापेक्षा



# श्रीवर्धनमध्ये मतदानाचा उत्साह ओसरला? अनेक भागांत कमी टक्केवारीची नोंद

श्रीवर्धन प्रतिनिधी सोपान निंबरे : यंदाच्या निवडणूक प्रक्रियेत अनेक ठिकाणी मतदारांमध्ये अपेक्षित उत्साह दिसून आला नाही. यामुळे मतदार नाराज की निष्क्रिय? कमी मतदानाने प्रश्न उपस्थित झाला आहे. काही मतदान केंद्रांवर मतदानाची टक्केवारी ५० टक्क्यांच्या आसपास किंवा त्याहून कमी नोंदवली गेली, तर मोजक्या भागांमध्येच सुमारे ७० टक्क्यांपर्यंत मतदान झाल्याचे चित्र दिसून आले.

कामानिमित्त मुंबई व इतर शहरांमध्ये वास्तव्यास असलेल्या मतदारांनी मोठ्या प्रमाणावर मतदानाकडे पाठ फिरवल्याचे स्थानिक पातळीवर बोलले जात आहे. सुट्टी किंवा प्रवासाची गैरसोय यामुळे अनेकांनी मतदानासाठी गावी येणे टाळल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

दरम्यान, वयोवृद्ध मतदारांची उपस्थितीही यावेळी लक्षणीयरीत्या कमी दिसून आली. आरोग्याच्या कारणांमुळे किंवा मतदान केंद्रांपर्यंत पोहोचण्यात येणाऱ्या अडचणींमुळे अनेक ज्येष्ठ नागरिक मतदानासाठी बाहेर पडले नाहीत, असे सांगितले जाते.ङ्गङ्गमतदार यादीबाबतही काही ठिकाणी संभ्रमाचे वातावरण होते. मृत्यू पावलेल्या व्यक्तींची नावे अद्याप यादीतून वगळली न गेल्याने एकूण मतदारसंख्या प्रत्यक्षात असलेल्या मतदारांपेक्षा जास्त असल्याचे चित्र निर्माण झाले. यामुळे मतदानाची टक्केवारी प्रत्यक्ष परिस्थितीपेक्षा कमी भासल्याची चर्चा आहे.

याशिवाय, अनेक गावांमध्ये उभे असलेले उमेदवार मतदारांसाठी अपरिचित असल्याची भावना व्यक्त होत आहे. विकासाच्या मुद्द्यांवर ठोस काम किंवा स्पष्ट दृष्टीकोन मतदारांना दिसून न आल्यानेही काही प्रमाणात नाराजी असल्याचे बोलले जात आहे. या सर्व बाबींचा परिणाम मतदानाच्या एकूण टक्केवारीवर झाल्याचे निरीक्षण राजकीय जाणकार व्यक्त करत आहेत.





**नागोठणे पंचायत समिती गणाच्या उमेदवार समृध्दीताई कोळी व राष्ट्रवादी काँग्रेसचे नागोठणे विभागीय अध्यक्ष संतोषशेठ कोळी यांनी मतदानाच्या दिवशी निडी गावाला भेट दिली तो क्षण (छाया–: नारायण म्हात्रे सहसंपादक दै सूर्योदय)**

# जनताहित फाउंडेशनचे संस्थापक/अध्यक्ष रितेश कांबळे यांच्या संकल्पातून २४ तास मोफत ॲम्ब्युलन्स सेवा लवकरच,जनताहित फाउंडेशनतर्फे मोफत रुग्णवाहिका सेवा

टिटवाळा,(प्रतिनिधी): आपत्कालीन परिस्थितीत वेळेवर रुग्णवाहिका न मिळाल्याने अनेकांना प्राण गमवावे लागतात. ही गंभीर समस्या ओळखून जनताहित फाउंडेशन या सामाजिक संस्थेने टिटवाळा आणि कल्याण ग्रामीण भागातील नागरिकांसाठी २४ तास पूर्णतः मोफत रुग्णवाहिका सेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.ङ्गअनेकदा खासगी रुग्णवाहिकांचे अवाढव्य भाडे सर्वसामान्यांना परवडत नाही किंवा रात्री-अपरात्री वाहन उपलब्ध होत नाही. त्यामुळे उपचारास विलंब होऊन परिस्थिती गंभीर बनते. हा विलंब टाळण्यासाठी ही मोफत सेवा सुरू करण्यात येत आहे. ही रुग्णवाहिका केवळ रुग्णांसाठीच नव्हे, तर गर्भवती महिला तसेच अपघातग्रस्तांसाठी 'देवदूत' ठरणार आहे.ङ्गविशेष म्हणजे, या सेवेसाठी नागरिकांकडून एकही रुपया शुल्क घेतले जाणार नाही. रुग्णवाहिका ही केवळ एक वाहन नसून ती संकटात सापडलेल्या व्यक्तीसाठी जीवनाची शेवटची आशा असते. वेळेवर मदत मिळाल्यास अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होण्यापासून वाचू शकतात. त्यामुळे ही सेवा अखंड, पारदर्शक आणि विश्वासार्ह ठेवण्याचा आमचा मानस असल्याची प्रतिक्रिया जनताहित फाउंडेशनचे संस्थापक व अध्यक्ष रितेश कांबळे यांनी व्यक्त केली.ङ्गमानवतेची सेवाङ्गजनताहित फाउंडेशन केवळ आरोग्य क्षेत्रातच नव्हे, तर निसर्ग संवर्धनातही अग्रेसर आहे. जखमी व आजारी पक्ष्यांचे प्राण वाचवणे, पर्यावरण रक्षण करणे अशा विविध उपक्रमांच्या माध्यमातून संस्था सामाजिक बांधिलकी जपत आहे. टिटवाळा व परिसरातील गरजू नागरिकांसाठी ही मोफत रुग्णवाहिका सेवा लवकरच कार्यान्वित होणार असून, त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.



भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती), संपर्क : ९०४९८११०६५ मु. भिंगळोली पो.ता.मंडणगड जि.रत्नागिरी, कोकण विभागीय कार्यालय पत्ता : निलेश महादेव आखाडे ०६ र.न.प.वसाहत नाचणे रोड रत्नागिरी.४१५६१२

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड- ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालयः जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )